# जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, मुंबई शहर

**ओल्ड कस्टम हाऊस, शहीद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई-४०० ००१**

Tel.-22665233 Fax.-22661239 Email-rdcmumbaicity@gmail.com

क्रमांक - रवका/टे-३/ध्वनीक्षेपक व ध्वनिवर्धक वापर/सुट/२०१९/५३

दिनांक - 16 FEB 2019

**वाचले :** १. शासन, पर्यावरण विभाग, शासन निर्णय क्रमांक ध्वनीप्र-२००९/प्र.क्र.१२/०८/तां.क.१, दिनांक २२.०८.२०१७

२. मा. उच्च न्यायालयाने याचिका क्र.१७३/२०१० दिनांक १६ ऑगस्ट, २०१६ रोजी दिलेले आदेश /निकालपत्र

३. पोलीस उपआयुक्त (अभियान), पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांचे कार्यालय यांचे दि.११.०२.२०१९ चे पत्र

४. उपप्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांचे ई-मेलव्दारे प्राप्त अभिप्राय दि.१२.०२.२०१९

**आदेश :**

ध्वनी प्रदुषण (नियमन व नियंत्रण) नियम, २००० च्या परिच्छेद ५ (३) नुसार ध्वनिक्षेपक व ध्वनिवर्धक यांचा वापर श्रोतगृहे, सभागृहे, सामुहिक सभागृहे आणि मेजवाणी कक्ष यासारख्या बंद जागा खेरीज इतर ठिकाणी सकाळी ६.०० वाजेपासून रात्री १२.०० वाजेपर्यंत सांस्कृतिक कार्यक्रम व धार्मिक कारणास्तव करता येतो. उपोद्घातात नमूद शासन निर्णयांनुसार व मा. उच्च न्यायालयाच्या आदेशान्वये वर्षभरातील १५ दिवस कोणते हे ठरविण्याची जबाबदारी यापुर्वी राज्य शासनावर होती. परंतू संदर्भ क्र. १ शासन, पर्यावरण विभाग, शासन निर्णय क्रमांक ध्वनीप्र-२००९/प्र.क्र.१२/०८/तां.क.१, दिनांक २२.०८.२०१७ अन्वये ती आता जिल्हाधिकारी यांचेकडे सुपूर्द करणेत आली आहे. शासन निर्णय दि.२२.०८.२०१७ नुसार पोलीस विभाग व ध्वनी प्राधिकरण यांचे अभिप्राय संदर्भीय क्र.३ व ४ अन्वये प्राप्त असून सन २०१९ यावर्षी १ जानेवारी ते ३१ डिसेंबर या कालावधीतील ध्वनिक्षेपक व ध्वनिवर्धक यांच्या वापराबाबत सुटीच्या १५ दिवसापैकी १३ दिवस सकाळी ६.०० वाजेपासून रात्री १२.०० वाजेपर्यंत ध्वनिक्षेपक व ध्वनिवर्धक यांचा वापर करण्याबाबत शासन निर्णय दि.२२.०८.२०१७ व्दारे मला प्रदान करणेत आलेल्या अधिकाराचा वापर करुन मी, जिल्हाधिकारी, मुंबई शहर जिल्हा सन २०१९ मधील खालील तक्त्यात नमुद वर्षभरातील १५ दिवसापैकी खालीलप्रमाणे १३ दिवस निश्चित करीत आहे.

| अ.क्र. | उत्सवाचे नाव | दिनांक | वार | वेळ |
|---|---|---|---|---|
| १ | शिवजयंती | १९.०२.२०१९ | मंगळवार | सकाळी ०६.०० ते रात्री १२.०० वाजेपर्यंत |
| २ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर जंयती | १४.०४.२०१९ | रविवार | |
| ३ | महाराष्ट्र दिन | ०१.०५.२०१९ | बुधवार | |
| ४ | गणेशोत्सव (दुसरा दिवस) | ०३.०९.२०१९ | मंगळवार | |
| | (पाचवा दिवस) | ०६.०९.२०१९ | शुक्रवार | |
| | (सहावा दिवस व गौरी विसर्जन) | ०७.०९.२०१९ | शनिवार | |
| | (अनंत चतुर्दशी) | १२.०९.२०१९ | गुरुवार | |
| ५ | नवरात्रोत्सव (अष्टमी)<br>(नवमी) | ०६.१०.२०१९<br>०७.१०.२०१९ | रविवार<br>सोमवार | |
| ६ | दिवाळी - लक्ष्मीपूजन | २७.१०.२०१९ | रविवार | |
| ७ | ईद - ए - मिलाद | १०.११.२०१९ | रविवार | |
| ८ | ख्रिसमस | २४.१२.२०१९ | मंगळवार | |
| ९ | ३१ डिसेंबर | ३१.१२.२०१९ | मंगळवार | |
| १० | उर्वरित २ दिवस | परवानगी पोलीस विभागाशी सल्लामसलत करुन महत्वाच्या कार्यक्रमासाठी आवश्यकतेनुसार दिली जाईल. | | |

(कृ.मा.प.)



Scanned by CamScanner

उपरोक्त तक्त्यात नमूद दिनांकास मुंबई शहर जिल्हयात ध्वनिक्षेपक व ध्वनिवर्धक इत्यादींच्या वापर ध्वनी प्रदुषण (नियमन व नियंत्रण) नियम, २००० मध्ये नमूद ध्वनीची विहीद मर्यादा राखणेच्या अटींवर सकाळी ६ वाजल्यापासून ते रात्री १२ वाजेपर्यंत सूट खालील अटींच्या अधिन राहून देणेत येत आहे.

(१) मा. उच्च न्यायालयाने वेळोवेळी ध्वनी प्रदूषणासंबंधात दिलेल्या आदेशात नमूद बाबींचे तंतोतंत पालन करावे व मा. न्यायालयाच्या आदेशाचे उल्लघंन होणार नाही याची काळजी घेण्यात यावी.

(२) ध्वनिक्षेपक व ध्वनिवर्धक इत्यादींच्या वापराबाबतच्या उपरोक्त सूट ही राज्य शासनामार्फत घोषित शांतता क्षेत्रात लागू होणार नाही.

(३) ध्वनिक्षेपक व ध्वनिवर्धक इत्यादींच्या वापराबाबतच्या उपरोक्त सूटीच्या कालावधीत ध्वनी प्रदूषण नियम २००० मधील नियम ३ व ४ चे पालन करण्यात यावे.

(४) ध्वनी प्रदूषण नियम, २००० अंतर्गत स्थापन केलेल्या ध्वनी प्राधिकरणाने त्यांच्याकडे प्राप्त तक्रारींवर मा. उच्च न्यायालयाने दि.१६ ऑगस्ट, २०१६ रोजी दिलेल्या आदेशात विहित पध्दतीने कार्यवाही करावी. तसेच प्राधिकरणाने निदर्शास आणून दिलेल्या बाबींवर प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांनी पर्यावरण संरक्षण कायदा, १९८६ च्या कलम १९ (अ) नुसार कार्यवाही करावी.

(५) केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाच्या ध्वनी प्रदुषण (नियमन व नियंत्रण) नियम, २००० च्या अधिसूचनेत घालून दिलेल्या ध्वनी मर्यादेचे व तरतूदींचे उल्लंघन होणार नाही व त्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना ध्वनी प्राधिकरणाने कराव्यात.

सदर आदेश या कार्यालयाचे www.mumbaicity.gov.in या संकेतस्थळावर देखील प्रसिध्द करणेत आलेला आहे.

(शिवाजी जोंधळे)
जिल्हाधिकारी, मुंबई शहर

**प्रत :**

१. मा. संचालक (पर्यावरण), पर्यावरण विभाग, १५ वा मजला, नविन प्रशासकीय भवन, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ यांना माहितीस्तव सविनय सादर
२. मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, क्रॉफर्ड मार्केट जवळ, मुंबई यांना माहिती व पुढील कार्यवाहीस्तव सविनय
३. मा. आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई यांना माहिती व पुढील कार्यवाहीस्तव सविनय
४. पोलीस उपआयुक्त (अभियान), मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांचे कार्यालय, क्रॉफर्ड मार्केट जवळ, मुंबई
५. उपप्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, रामकर चेंबर, २१६, ई-विंग, २ रा मजला,जैन मंदिराजवळ, देवनार गाव रोड, गोंवडी (पुर्व), मुंबई-४०० ०८८
६. ॲड श्री. नरेश दहिबावकर, अध्यक्ष, बृहन्मुंबई सार्वजनिक गणेशोत्सव समन्वय समिती, वीर श्रीकांत हरकर मार्ग, शहीद भगतसिंग मैदानासमोर, अभ्युदय नगर, काळाचौकी, मुंबई-४०० ०३३
७. जिल्हा सूचना व विज्ञान अधिकारी (NIC), मुंबई शहर यांना संकेतस्थळावर तात्काळ प्रसिध्दीसाठी



Scanned by CamScanner